## * ६. महाविद्यालयीन अभ्यासविषयक नियम व विद्यार्थी आचार संहिता :

### अ) सामान्य नियम व निर्बंध -

१. महाविद्यालय प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्याजवळ ओळखपत्र सक्तीचे आहे.

२. विद्यार्थ्यांनी प्रत्येक दिवशी नियमितपणे सर्व तासांना, चाचणी परीक्षांना आणि गृहपाठ व प्रात्यक्षिकांना उपस्थित राहीले पाहिजे. विद्यापीठाच्या नियमानुसार ८० % उपस्थिती सक्तीची आहे. नसल्यास विद्यापीठ परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.

३. विभाग प्रमुख, वर्ग शिक्षक अथवा विषय शिक्षकांच्या पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहू नये. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना आपली प्रगती वेळोवेळी सांगावी. शक्य तेव्हा पालकांनी प्राचार्य, वर्गशिक्षक यांना भेटत जावे.

४. विद्यार्थ्यांची असमाधानकारक उपस्थिती, अत्यल्प प्रगती किंवा गैरवर्तन आढळून आल्यास दंड आकारण्यात येईल किंवा सत्र नामंजूर केले जाईल.

५. विद्यार्थ्यांना आपल्या विषयाची अथवा इतर शंका असल्यास संबंधीताबरोबर इ-मेलद्वारे संपर्क साधावा.

### ब) वर्तनविषयक आचारसंहिता :

१. चांगली जीवनमूल्ये, आदर्श वर्तन, शिस्तप्रियता, वक्तशीरपणा आणि अभ्यासातील उत्कृष्ट गुणवत्तेला महाविद्यालयात सर्वोच्च महत्व दिले जाते.

२. महाविद्यालयातर्फे वेळोवेळी आयोजित अभ्यासेत्तर उपक्रमातील (Extra Curricular activities) सक्रिय सहभाग सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य राहील.

३. महाविद्यालयाच्या विविध भागातील प्रचलित आचारसंहिता व नियमांचे पालन करणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य राहील.

४. नियमांचा भंग केल्यास संबंधीत विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येऊ शकेल.

५. सायकल, मोटारसायकल, स्कूटर्स इ. वाहने उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर कुलूप लावून ठेवावीत. महाविद्यालयाच्या परिसरात इतरत्र ठेऊ नये.

६. महाविद्यालयाच्या अथवा परिसरातील इतरत्र शिक्षण संस्थांच्या कोणत्याही प्रकारच्या इमारतीचे, साहित्य फर्निचरचे, पुस्तकांचे, नियतकालिकांचे, मालमत्तेचे नुकसान केल्यास संबंधीत विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

७. महाविद्यालयाच्या संदर्भातील विविध परिपत्रके, परीक्षा, शिष्यवृत्त्या, कार्यक्रम याबाबतची माहिती वेळोवेळी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येते. विद्यार्थ्याने नोटीस बोर्डावरील माहिती

घेण्याची सवय लावून घ्यावी. नोटीस न वाचल्यामुळे एखाद्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

८. महाविद्यालयाचे वर्ग, ग्रंथालय, वसतिगृहे, आवार व इतर इमारती इ. ठिकाणी स्वच्छता राखण्याची जबाबदारी महाविद्यालयाप्रमाणेच सर्व विद्यार्थ्यांवर आहे. गुन्हा करणाऱ्या विद्यार्थ्यास रु. १०० /- दंड भरावा लागेल.

९. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात किंवा बाहेर संस्थेच्या नावलौकिकास बाधा येईल असे वर्तन करु नये. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात मोबाईल बंद ठेवावा. मोबाईल वापरतांना आढळल्यास रु. १०० / - दंड केला जाईल किंवा मोबाईल जप्त केला जाईल.

१०. सर्व दुचाकी स्वारानी हेल्मेट शिवाय महाविद्यालयात प्रवेश करू नये.

११. ड्रेस कोडचे सर्वांनी पालन करावे.

**क) महाविद्यालय चालू असताना खालील सूचना कटाक्षाने पाळाव्यात**

१. विद्यार्थी / विद्यार्थिनींने निवडलेल्या सर्व विषयांच्या तासांना हजर राहणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी व्हरांड्यात विनाकारण ये - जा करु नये.

३. दरवाजा वाजवून वर्गात प्रवेश करू नये.

४. वर्गात प्रत्येकाने शांतता पाळली पाहिजे.

५. वर्गातील विद्यार्थ्यांनी संबंधीत प्राध्यापकांच्या परवानगीशिवाय वर्ग सोडू नये.

६. वर्गात अथवा जिन्यात, व्हरांड्यात भिंतीवर थुंकू नये.

७. वेळापत्रकाप्रमाणे तासिका चालू असतांना विद्यार्थ्यांनी बाहेर थांबू नये. तसे आढळल्यास योग्य ती कारवाई केली जाईल.

८. महाविद्यालयाचा कोणताही कार्यक्रम चालू असतांना विद्यार्थ्यांनी ओळखपत्र जवळ ठेवणे बंधनकारक आहे.

## * ७. शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलती विषयक नियमावली -

आर्थिक सहाय्य शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी विद्यार्थी - विद्यार्थिनींने वेळेवर अर्जाची पुर्तता: करुन देणे आवश्यक आहे. अर्जाची वेळेवर पूर्तता करुन न दिल्यास विद्यार्थ्यांच्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

### १. गरीब विद्यार्थी सहाय्य निधी योजना (Poor Boy`s Fund)

आदरणीय पद्मभूषण मा.खा.डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रेरणेतून महाविद्यालयामध्ये गरीब

विद्यार्थी सहाय्य निधी योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. महाविद्यालय व ग्रामस्थांच्या आर्थिक सहकार्यातून या निधीची उभारणी केली जाते. ज्या विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारची शिष्यवृत्ती अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत, असे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी या निधीचा वापर केला जातो.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी महाविद्यालयात नियमित असावा, त्याची वर्तणूक चांगली असावी.

**२. सरकारी सवलती व इतर शिष्यवृत्त्या :**

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या व शासकीय नियमाप्रमाणे पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना खालील आर्थिक सवलती व शिष्यवृत्त्या मिळू शकतात. त्यासाठी खालील नियमांचे पालन करावे.

अ) विद्यार्थ्यास एका वेळी एकच शिष्यवृत्ती घेता येते.

ब) सवलती व शिष्यवृत्तीची पूर्ण माहिती, अटी विद्यार्थ्यांनी लक्षात घ्याव्यात.

क) आपण कोणत्या आर्थिक सवलती व शिष्यवृत्तीस पात्र होऊ शकतो याची प्रवेश घेतानाच विद्यार्थी व पालकांनी खात्री करुन घ्यावी.

ड) सरकारी शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत: Online Form भरुन हार्ड कॉपी महाविद्यालयात वेळेत जमा करावी.

इ) या संदर्भात सवलतीच्या अटी, रक्कम अर्जाची शेवटची तारीख, कागदपत्रे यांची वेळेत पूर्तता करावी व संबंधीत अधिकाऱ्यांशी त्वरीत संपर्क साधावा.

ई) शिष्यवृत्ती / आर्थिक सवलतीचे अर्ज कार्यालयात स्वत: द्यावेत. रितसर पोहोच घ्यावी. पोहोच दाखविल्याशिवाय तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

**३. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती -**

मागासलेल्या वर्गीकृत अनुसूचित जाती-जमातींच्या ओ.बी.सी. / एस.सी. / एस.टी. / डी.टी. / एन.टी. मध्यवर्ती आणि राज्य सरकारी विद्यावेतने, शिष्यवृत्ती सवलती मिळतात. नापास झालेल्या विद्यार्थ्यास फक्त शिकवणी फी मिळते. निर्वाह भत्ता मिळत नाही. एका घरातील दोन मुलांना या सवलतीचा फायदा मिळतो. तथापी तिसरे अपत्य मुलगी असल्यास या नियमांस अपवाद करुन शिष्यवृत्ती दिली जाते. एस.सी./एस.टी. च्या विद्यार्थ्यांसाठी रु. १,००,०००/- रुपये (रुपये एक लाख मात्र) च्या आत उत्पन्न गटातील पालकांच्या मुलांना पूर्ण फी व पूर्ण दराने निर्वाह भत्ता मिळतो. डी.टी./एन.टी./ओ.बी.सी./ एस.बी.सी या संवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. ४९,०००/- च्या आत असेल तर निर्वाह भत्ता पूर्ण दराने व रु. ६५,२९०/- च्या आत असेल तर फक्त फी मिळते. या शिष्यवृत्तीकरिता विद्यार्थ्यांने ठराविक नमून्यातील महाविद्यालयाचा फॉर्म भरणे आवश्यक आहे.

टीप :-

१) कोणत्याही मागासवर्गीय विद्यार्थ्याने इ.बी.सी./ प्रतिज्ञापत्र/पी.टी.डब्लू./एस.टी.डब्ल्यू. इ. सवलतींचे फॉर्म भरु नयेत.

२) शिष्यवृत्ती मंजुरीसाठी विद्यार्थ्यांची ८० % उपस्थिती अनिवार्य आहे. अन्यथा शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही. पर्यायाने महाविद्यालयाची संपूर्ण फी भरावी लागेल.

**४) प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींना मिळणारी शिष्यवृत्ती :-**

प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींना असणाऱ्या सरकारी सवलतीसाठी प्रतिवर्षी पास होणे आवश्यक आहे.

टिप : सेवानिवृत्त शिक्षकांच्या मुलांना ही सवलत मिळत नाही.

**५) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुला-मुलींना मिळणारी शिष्यवृत्ती :-**

शिष्यवृत्ती व आर्थिक सवलत मिळण्यासाठी पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ३६००/- चे आत असावे लागते. नियमाप्रमाणे शिष्यवृत्ती मंजूर झाली म्हणजे महाविद्यालयाच्या शिकवणी फीशिवाय दरमहा रु.२०/- प्रमाणे भत्ता मिळतो.

**६) विडी कामगारांच्या मुला-मुलींना मिळणारी शिष्यवृत्ती :-**

विडी कामगारांच्या मुला-मुलींना मिळणारी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ४८००/- पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना गुणांची अट नाही. विद्यार्थी-विद्यार्थिनींचे पालक विडी कारखान्यांत नोकरीस असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**७) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती :-**

इ. १२ वी परीक्षेस किमान ८० % गुण मिळवणारे विद्यार्थी ही शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी अर्ज करु शकतात. एच.एस.सी. बोर्डाकडून विद्यार्थी ज्या महाविद्यालयात शिकत होता तेथे शिष्यवृत्तीचे अर्ज पाठविले जातात. विद्यार्थ्यांनी असे अर्ज प्राप्त झाल्यानंतर योग्य त्या पूर्ततेसाठी महाविद्यालयात सादर करावे.

**८) राज्य सवरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती :-**

इ. १२ वी परीक्षेस किमान ८० % च्या पुढे गुण मिळविणारे विद्यार्थी ही शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी अर्ज करु शकतात. ही शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी पालकांच्या वार्षिक उत्पन्नांची कोणतीही अट नाही.